
Research Paper पे.न. 71 ते 73

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume -VI Issue - I
January - March - 2017



AJANTA PRAKASHAN

59

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

VOLUME - VI ISSUE - I JANUARY - MARCH - 2017 AURANGABAD

| IMPACT FACTOR - 2015 |
|---|
| 3.378 |
| www.sjifactor.com |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),

M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

**Ajanta Prakashan**

**Aurangabad. (M.S.)**

60

## CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| १० | 'खडी गंमत लोकनाट्य' : एक शोध अभ्यास<br>प्रा. मनोज देविदास उज्जैनकर | ४१-४९ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विषयात आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणाचा अभ्यास (१९६७ ते डिसेंबर २०१३)<br>प्रा. बटुळे विठ्ठल दशरथ<br>डॉ. प्रा. उरकूडकर एस. एच. | ५०-५५ |
| १२ | गोंधळ विधिनाट्याचे स्वरुप आणि प्रायोगिकमुल्य<br>शिवाजी सटवाजी वाघमारे | ५६-५८ |
| १३ | भारतीय अर्थव्यवस्था ही रोखीची अर्थव्यवस्था म्हणून ओळख<br>प्रा. डॉ. सुभाष प्रभू राठोड | ५९-६२ |
| १४ | लिंग आणि सामाजीकरण<br>रामटेके पुरुषोत्तम वारलू | ६३-६५ |
| १५ | बसवेश्वरांचे जीवनमुल्य<br>डॉ. अपर्णा प्र. जिरवणकर | ६६-७० |
| १६ | आगळा वेगळा ''समाजसमन्वयक''<br>प्रा. डॉ. सुनंदा किसनराव रेवसे | ७१-७३ |
| १ | हिंदी-अध्ययन में अन्य भाषाओं के प्रभाव की समस्याएँ<br>डॉ. संजय भाऊसाहेब दवंगे | १-२ |

१६

# आगळा वेगळा ''समाजसमन्वयक''

प्रा. डॉ. सुनंदा किसनराव रेवसे

''गल्ली गोठ्यानं झाळत
सफा करे तो गटारं
कोन्या गरिबाघरची मांगे
हातात भाकर''

अशा स्वरुपाचे एखाद्या संताचे वर्णन केले जात असेल तर ते वृथा मानू नये. कारण 'संतासारखे रडता येईल का ?' या प्रश्नावरच ारी उत्तरे स्थिरावतात. आज तब्बल ६० वर्षानंतरही बहुजनांच्या मनमंदिरात ज्याने आपली मुद्रा उमटवली आहे असा सामान्यांचा असामान्य ज[illegible]यक म्हणजे अंधश्रध्देचा कर्दनकाळ, स्वच्छतेचा पूजारी दीनांचा नाथ, दशसूत्रीच्या माध्यमातून आजचा रोकडा धर्म सांगणारे वैराग्यमूर्ती ाडगेबाबा होत. त्यांच्या ठिकाणी

१) गौतम बुध्दासारखा गृहत्याग
२) ज्ञानदेवासारखी भक्ती
३) तुकारामासारखे वैराग्य
४) एकनाथासारखी भूतदया
५) रामदासासारखी आस्तिकता
६) म. गांधी सारखे रचनात्मक कार्य
७) रामकृष्ण परमहंसासारखा सर्वधर्मसमभाव

हे सारे गुणधर्म एकवटले होते. त्या अर्थाने गाडगे बाबा हे एका क्रांतीयुगाचे प्रवर्तक ठरतात. युगस्पंदन टिपणारे युगसाक्षी नायक ठरतात. जनता जनार्दनाशी कीर्तनाच्या माध्यमातून संपर्क साधणारे 'समाज समन्वयक' ठरतात.

कर्म आणि वैराग्य हेच संत गाडगेबाबांच्या जीवनातले समन्वय केंद्र आहे. त्या समन्वयाचा कीर्तन हा आत्मा आहे. ज्यांच्या कीर्तनाने ा समाजभूमीची नांगरटी झाली. आणि त्यांनी

१) भुकेलेल्यांना अन्न
२) तहानलेल्यांना पाणी
३) उघड्या नागड्यांना वस्त्र
४) गरीब मुलामुलींना शिक्षण
५) बेघरांना आसरा
६) अंध, पंगू, रोग्यांना औषधोपचार
७) बेकारांना रोजगार
८) पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना अभय
९) गरीब तरुण-तरुणींचे लग्न

१०) दु:खी व निराशांना हिंमत इ. आघाड्यावर भर दिला. साबरहुकूम शिस्तबध्द कार्याची आखणी केली. हे करत असताना त्यांनी लोकशिक्षकाची भूमिका बजावली. खरंच गाडगेबाबानी काय केले नाही ?

"कण कण करुनी कोटी केले
वणवण फिरुणी कण कण झिजले
बाबा दु:खी जनतेसाठी"

बाबांची दशसूत्री म्हणजे मानवाधिकाराची नांदी आहे. लोकशाहीची ती अमर मूल्ये आहेत. मानव व समाजाच्या समन्वयाची ती संस्कार केंद्रे आहेत. त्या अर्थाने गाडगेबाबा उच्च कोटीतील 'समाज समन्वयक' ठरतात. तीच त्यांची शिकवण ठरते.

समाजामध्ये गरीब श्रीमंत ही दरी अत्यंत मंद स्वरुपाची आहे. ही दरी बाबांनी आत्यंतीक कळवळ्यापोटी नाहिसी करण्याचा सपाटा सुरु केला. हे सपाटीकरण करत असताना त्यांना 'पोटाची आग अन् भलत्यामागे लाग' हे भूकेचं तत्वज्ञान लहानपासूनच ठावूक होतं. अशावेळी ते उपाशी लोकांचे कैवारी बनले. आपल्या कृतीयुक्त उपक्रमातून संत कबीराचा हवाला देत भूकेले त्यांना अन्न सदावर्ताच्या रुपाने वाटू लागले. आणि मुखाने म्हणू लागले -

"कबीर कहे कमाल कू
दो बाते लिख ले
कर साहब की बंदगी
भूखे को कुछ दै."

लाख संपत्तीचे तुम्ही मालक असाल पण तुमच्या संवेदना जर बोथट झाल्या असतील तर तुमचा जयजयकार नाही. आपल्या सोबत उपाशी जीवाला एकदोन घास जरी देता आला तर देवून पह व आनंद घेवून पहा. किती मोठ्ठा असतो तो आनंद देण्यातला आनंद घेण्यात नाही म्हणून ते म्हणतात -

देने को अन्नदान
लेने को हरिनाम
तरणे को लीनता और
डुबने को अभिमान".

संत गाडगेबाबांनी अन्नछत्रे चालवलीत. सदावर्ते चालवली आजही त्यांनी काढलेल्या धर्मशाळांमधून रोज सदावर्ते चालतात. असंख्य भिकाऱ्यांचे आजाऱ्यांचे ते तारणहार ठरले. समाजातील एक वर्ग रोजं दगडाच्या, मौल्यवान धातूच्या देवाला गोडाधोडाच्या नैवेद्य दाखवतो स्वत:ही मिष्टान्न सेवन करतो आणि उरलेले कागदात गुंडाळून किंवा तसेच उघडयावर किंवा उकिरड्यावर फेकून देतो. पण त्याचे उपाशी माणसाकडे लक्ष जात नाही. त्याच्याच बंगल्याच्या बाजूला एखाद्या दुकानाच्या किंवा इमारतीच्या ओट्यावर झोपलेल्या भिकारी वर्गातील लोकांकडे त्याचे लक्षच जात नाही. अशा लोकांकडे गाडगेबाबांचे लक्ष गेले. ह्या विरागी महामानवाने त्यांना आपल्या हृद्याशी धरले आणि सिध्द करुन दाखविले.

"ज्यासी आपंगिता नाही, त्यासी धरी जो हृदयी तोची साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा."

पाण्याचे दुसरे नाव जिवन आहे. तहानलेल्याची तहान भागविणे हा फार मोठा धर्म आहे. तो बाबांनी जाणला होता. म्हणूनच त्यांनी ठिकठिकाणी पानपोया निर्माण केल्या होत्या. त्या निर्मितीमागे त्यांचा दूरदृष्टीकोन होता. रेल्वेस्टेशनवर सुध्दा त्यांनी पानपोया सुरु केल्या होत्या. प्रज्ञा-शील-करुणा हे मानवमुक्तीचं तत्वज्ञान कोळून कोळून पिवून जगणारा हा पुण्यपुरुष होता. म्हणूनच ते नेहमी म्हणायचे,

''फुलवात तेवत आहे तोवर तिच्या उजेडात
काय पहायचे ते पाहून घ्यावे. केव्हा वारा
येईल नि मह विझेल, याचा काय नेम ?''

म्हणूनच ते मातीचं खापर डोक्यावर घेत आणि कानात फुटकी कवडी घालून, चिंध्यांचा अंगरखा पांघरीत. जणू त्यांना जीवनाच्या नश्वरतेचीच जाणीव करुन द्यायची होती. म्हणूनच त्यांनी शिस्तीचाच एक भाग म्हणून शब्दांवर प्रचंड भर दिला होता. ते सांगायचे -

''शब्द संभालके बोलिये । शब्द को हात न पाव
एक शब्द करे भलाई । दुजा करें घाव.''

बाबांनी आयुष्यात कधी कोणाला अंगारा दिला नाही. आर्शीवाद दिला नाही. आणि पाया तर कधीच पडू दिले नाही. ''मी कोणाचा गुरु नाही, माझा कोणी चेला नाही'' अशा विचारप्रणालीचेच त्यांनी पाईकत्व आजन्म केले.

आजही अमरावती जिल्ह्यातील ऋणमोचन गावी दर पौष रविवारी चंद्रभागेच्या काठी फार मोठी जत्रा भरते. रथसप्तमीच्या दिवशी उघड्यानागड्यांना वस्त्रदान केले जाते. बेघरांना आश्रय दिला जातो. मरावे परी किर्तीरुपी उरावे हेच खरे बाबांचे वर्णन करावे. अन्य काय ?

गाडगेबाबांनी उभारलेली ज्ञानमंदिरें म्हणजे संस्कार केंद्रेच होती. तीच मंदिरे होती. या मंदिरात आदिवासीचा पोरगा, एखाद्या धनगराचा मुलगा, एखाद्या मांगाची मुलगी जेव्हा पाटीवर सरस्वतीची अक्षरं किंवा अंकलिपी काढण्यात गर्क होई तेव्हा ते रुप बाबांना साक्षात साक्षात सगुण ईश्वरासारखे मनोज्ञ वाटायचे. ते खूप हरवून जायचे. म्हणूनच ती नुसती ज्ञानमंदिरे नव्हती. तर मानवतेची पूजा बांधणारी उपासना केंद्रे होती. या केंद्रामधूनच गंजून गेलेल्या ईश्वर कल्पनेला त्यांनी नवा उजाळा दिला. हातात खराटा घेतला. आणि पापणी उघडी ठेवून अनुभवांच्या शाळेत ते शिकले. तुकोबा-कबीर यांचे संतत्व जगून दाखवले. आजपर्यंत ते टिकून आहे. अखेरीस बाबांबद्दल जे कवीने लिहिलं आहे तेच इथे नमूद करते.

''पूर्णेच्या अमृत जलासम सहज तुझी वैखरी
तुझया कीर्तनी म्हणून रमली
अवघी जन पंढरी
मलीन मनाची धुतली वस्त्रे
झाडिलेस अज्ञान
खापरातून सूर्य वाटला
अंधाराचे घरी''

## संदर्भ सूची


१) लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन व कार्य - प्रा. द. ता. भोसले, ग्रंथाली प्रकाशन, उपर, मुंबई आवृत्ती, ५ वी.
२) जन जागरण की अमर ज्योती - संत गाडगेबाबा, ॲड नारायणदास राठी, श्री गाडगेमहाराज प्रकाशन, समिती, मुंबई-४
३) : गाडगेबाबाप्रबोधनकार ठाकरे
४) लोकाराज्य विशेषांक १९७७
५) लोकसंत गाडगे महाराज - रा. तु. भगत